# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/03/2024 (सोमवार) सायंकाळ


---

## नागपूर ग्रामीण हद्‌दीत वाढत्या गोवंश चोरी करणाऱ्या टोळीचा केला पर्दाफाश

## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी नागपूर ग्रामीण घटकाअंतर्गत जनावरे चोरीच्या वाढत्या घटना लक्षात घेता अश्या गुन्हयांचा समांतर तपास करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणला निर्देश दिले आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांनी जनावर चोरीचे गुन्हे उघडकीस आणने कामी विशेष पथक तयार केले. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जिल्हयातील अउघड जनावरे चोरीच्या गुन्हयांचा समांतर तपास सुरु केला.

प्राप्त आदेशानुसार पो.स्टे. कळमेश्वर अप. क्र. १४८/२०२४ कलम ३७९ भादवि गुन्हयाचा तांत्रीकदृष्टया तसेच मुखबिर कार्यान्वीत करुन समांतर तपास केला. दि. १०/०३/२०२४ रोजी विशेष पथकासह कळमेश्वर हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना मुखबिराने गोपनियरित्या खात्रीशिर माहिती दिली की, कळमेश्वर, कोंढाळी व कुही या भागातून गायी बैल चोरी करणारी टोळी एक पांढऱ्या रंगाची महिन्द्रा कंपणीची XUV ५०० वाहन क्र. MH 02 U 270 हे येरला गावात फिरत आहे. मुखबिराने दिलेल्या बातमीवरुन सदर वाहनास ताब्यात घेण्याकरीता स्टाफसह येरला फाटा येथे नाकाबंदी सुरु केली, नाकाबंदी दरम्यान वाहन क्र. MH 02 U 270 निदर्शनास पडले सदर वाहनास थांबविले असता त्यामध्ये तिन युवक मिळून आले. त्यांचे नाव पत्ता विचारले असता वाहन चालविणाऱ्या इसमाने आपले नाव शेख साजीद उर्फ विरा शेख शब्बीर वय २४ वर्ष, रा. ताजनगर, टेका नाका, पंचशिल रोड, नागपूर असे सांगीतले. त्याचे अन्य साथीदारांनी आपले नाव पत्ता अनिल रमेश ऊईके वय २६ वर्ष, रा. यशोदीप कॉलनी, नागपूर व गौरव उर्फ बाबा गणेश घरडे, वय २५ वर्ष रा. कामगार नगर, नागपूर असे सांगीतले. तिन्ही इसमांना ताब्यात घेवून कळमेश्वर, कोंढाळी आणि कुही हद्दीमधून चोरी गेलेल्या जनावराबाबत विचारपुस केली असता सुरवातीला ते टाळाटाळ करुन उडवाउडविचे उत्तरे देवू लागला. परंतु त्याची सखोल चौकशी केली असता शेख साजीद याने माहिती दिली की, आरोपी १) अनिल रमेश ऊईके वय २६ वर्ष, रा. यशोदीप कॉलनी, नागपूर, २) गौरव उर्फ बाबा गणेश घरडे, वय २२ वर्ष रा. कामगार नगर, नागपूर, ३) हरी उर्फ रेहान शेख वय २६ वर्ष रा. शारदा चौक, नागपूर, 4) नाझीम खान मुस्तफा खान वय २३ वर्ष रा. महेन्द्र नगर, नागपूर, ५) नौशाद कुरैशी उर्फ जावाई वय ३० वर्ष रा. डोबी, मोमीनपुरा, नागपूर, 6) गुड्डू उर्फ दादा अन्सारी वय २८ वर्ष रा. डोबी, अन्सार नगर, मोमीनपुरा, नागपूर यांनी मिळून कळमेश्वर, कोंढाळी व कुही हद्दीतील काही गावातून गायी व बैल चोरी केलेले आहेत. या कामाकरीता मोमीनपुरा, नागपूर येथे राहणारा गुड्डू उर्फ दादा अन्सारी याने त्याचेकडे असेलेले एक पांढऱ्या रंगाचे महिन्द्रा कंपणीचे XUV ५०० क्र. MH 02 U 270 दिले आहे. चोरी करुन आणलेले जनावरे शेख शादाब शेख गुलाब वय २५ वर्ष, रा. मोहम्मदीया मज्जीद जवळ महात्मा फुले बाजार अंसारी नगर मोमीनपुरा यास विकल्याचे सांगितले. यापुर्वी आरोपीतांनी कळमेश्वर येथील सेलु आणि खापरी

गावातून तसेच कोंडी येथील पांजरा गावातून गायी व बैल चोरी केले अशी माहिती दिली. आरोपींकडुन १) एक पांढऱ्या रंगाचे महिन्द्रा कंपणीचे XUV ५०० वाहन क्र. MH 02 U 270 .किंमती ८,००,०००/— रुपये २) VIVO कंपणीचा अॅन्ड्रॉईड मोबाईल किं. १०,०००/— रु.

३) एक सिल्वर रंगाचा किपॅड मोबाईल १,०००/— रुपये असा एकुण ८,११,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उघडकीस केलेले गुन्हे

१) पो.स्टे. कळमेश्वर अप.क्र. १४८/२०२४ कलम ३७९ भादवि

२) पो.स्टे. कळमेश्वर अप.क्र. १४७/२०२४ कलम ३७९ भादवि

३) पो.स्टे. कळमेश्वर अप.क्र. २४/२०२४ कलम ३७९ भादवि

४) पो.स्टे. कळमेश्वर अप.क्र. ११२/२०२४ कलम ३७९ भादवि

५) पो.स्टे. कळमेश्वर अप.क्र. १३९/२०२४ कलम ३७९ भादवि

६) पो.स्टे. कळमेश्वर अप.क्र. ०८/२०२४ कलम ३७९, ५११ भादवि

७) पो.स्टे. कोंढाळी अप.क्र. २७५/२०२४ कलम ३७९ भादवि

८) पो.स्टे. कुही अप.क्र. १०४/२०२४ कलम ३७९ भादवि

जप्त मुद्देमाल व कागदपत्रे आरोपींची वैद्यकीय तपासनी करून पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे कलमेश्वर यांचे ताब्यात दिले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे API आशिषसिंह ठाकुर PSI बटुलाल पांडे ASI घडेकर, नाना राऊत, HC दिनेश आधापुरे, विनोद काळे, इक्बाल शेख, प्रमोद तभाने, रंजीत जाधव, मिलिंद नांदूरकर, NPC संजय भदोरिया, निलेश इंगूलकर, रोहन डखोरे, अमृत किनेगे सायबर चे सतीश राठोड, DPC अमोल राऊत, आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली



<u>**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक**</u>

<u>**वाहनासह एकुण २०,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**</u>

दिनांक १०/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा मानेगाव कला शिवार हिवराबाजार ते पवनी रोड येथे अवैधरित्या विनापरवाना रेती (वाळू) लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा मानेगाव कला शिवार हिवराबाजार ते पवनी रोड येथे नाकाबंदी करून यातील आरोपी चालक शेख अमीन शेख गफार वय ३६ वर्ष पठानणपुरा अमरावती जि. अमरावती हा त्याच्या ताब्यातील १४ चक्का एल पी ट्रक एम एच ४९ बी झेड ०९३० मध्ये अंदाजे १० ब्रास रेती मालक नामे अब्दुल वहीद अब्दुल कादर वय ३५ वर्ष रा जीमल कॉलेंन अमरावती याचे सांगणे वरूण विनापरवाना अवैदरित्या कोणतेही शासकीय रॉयल्टी परवाना न बाळगता चोरी करूण वाहतुक करतांनी मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून १४ चक्का एल पी ट्रक एम एच ४९ बी झेड ०९३० किमती २०,००,००० /— व अदाजे १० ब्रास रेती ३०,००० रू अशा एकुण किमती २०,३०,०००/ रू जप्त करण्यात आला आहे. आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे देवलापार येथे कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, कलम ४, २१ खाण खनिज अधि. सहकलम ३ सार्वजनिक संपत्तीचे नुकसान अन्वये पो. स्टे. देवलापार येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे देवलापार येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक राजेश पाटील, सपोनि. पाटील, पोहवा राहुल रंगारी, नापोशि शिवचरण नागपुरे, पोहवा विनोद मरस्कोल्हे, पोशि मनिष चौकसे, सफौ सोनटक्के यांनी केली.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**